कर्नाटक सरकार

# गणित

## MATHEMATICS
## (Revised)
## Marathi Medium
## मराठी माध्यम

# 4

## इयत्ता – चौथी
## Fourth Standard

## भाग – 2
## Part – II

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

KARNATAKA TEXT BOOK SOCIETY (R).,
6th Cross, Malleshwaram,
Bangalore - 560 003.

# भाग – 2

## अनुक्रमणिका

U9X5P2


| क्रम संख्या | प्रकरण | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| 10 | आर्थिक संकलन आणि व्यवहार | 1 - 25 |
| 11 | लांबीचे मापन | 26 - 42 |
| 12 | मोजमाप (वजन) | 43 - 56 |
| 13 | घनफळाचे मापन | 57 - 69 |
| 14 | वेळ | 70 - 89 |
| 15 | माहिती संग्रह आणि विवरण | 90 - 98 |
| 16 | नमूने आणि सममिती | 99 - 114 |
| 17 | टॅनग्रॅम आणि विशिष्ट रचना | 115 - 120 |
| 18 | घनाकृती | 121 - 134 |


@KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रकरण–10

# आर्थिक संकलन आणि व्यवहार

A7S9Y3

**या प्रकरणाच्या अध्ययनानंतर तुम्ही :**

- पैशांची बेरीज व वजाबाकी करू शकाल.
- अंक गणितातील मूलभूत क्रिया वापरून एक किंवा अनेक वस्तूंची किंमत किंवा एकूण किंमत काढू शकाल.
- किंमतीची यादी व पावती याबद्दल माहिती द्याल.

तुम्ही मागील इयत्तेत रूपयाचे पैशामध्ये, पैशांचे रूपयामध्ये रूपांतर तसेच पैशांची बेरीज व वजाबाकी शिकला आहात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**खालील आठवा :**

- 1 रूपया बरोबर 100 पैसे
- जेव्हा रूपयाचे पैश्यामध्ये रूपांतर करतो तेव्हा रूपयाला 100 ने गुणावे.
- जेव्हा पैशाचे रूपयामध्ये रूपातंर करतो तेव्हा पैश्याला 100 ने भागावे.

**I. खालील रिकाम्या जागा भरा.**

1) ₹10 = ......................... पैसे

2) ₹15 = ......................... पैसे

3) ₹ 6. 25 = ......................... पैसे

4) 500 पैसे = ₹.........................

5) 657 पैसे = ₹......................... आणि ......................... पैसे

## II. दिलेल्या सुचनेप्रमाणे सोडवा.

(अ) बेरीज

| | रूपये | पैसे |
|---|---|---|
| | 26 | 50 |
| (+) | 23 | 50 |
| उत्तर | | |

(आ) वजाबाकी

| | रूपये | पैसे |
|---|---|---|
| | 49 | 50 |
| (–) | 30 | 25 |
| उत्तर | | |

## रकमेची बेरीज

**गट न करता स्तंभात मांडणी करून रूपये व पैसे यांची बेरीज कशी करतात ते माहीत आहे.**

दुकानामधून आपण वेगवेगळ्या वस्तू खरेदी करतो. जेव्हा त्या वस्तूची एकूण रक्कम देतो. जर दिलेली रक्कम एकूण रक्कमेपेक्षा जास्त झाली तर दुकानदार रक्कम परत करतो.

मागील इयत्तेत तुम्ही हातचा न घेता रकमेची बेरीज कशी करतात ते शिकला आहात ते आठवा आणि खालील उदाहरणे सोडवा.

**उदाहरण 1 :**

रवीने ₹ 7.50 ची वही आणि ₹ 4.50 पेन्सिल एका स्टेशनरी दुकानातून खरेदी केले. तर त्याने दुकानदाराला एकूण किती रूपये द्यायला पाहिजे?

जेव्हा ₹ 7.50 आणि ₹ 4.50 यांची बेरीज करतो एकूण किती बेरीज येते?

₹ 12.00 होय कि नाही?

₹ 12.00 कसे काढतात?

(1)
वहीची किंमत ₹ 7.50
पेन्सिलची किंमत ₹ 4.50

एकूण किंमत ₹ 12.00

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

**पायरी 1 :** 50 पैसे + 50 पैसे = 100 पैसे

तुम्हाला माहीत आहे 100 पैसे = 1 रूपया

म्हणून पैशाच्या स्तंभात 0(शून्य) लिहा आणि रूपया स्तंभात 1 रूपये लिहा.

**पायरी 2 :** रूपये व रूपये यांची बेरीज करा.

₹1 + ₹ 7 + ₹4 = ₹12

म्हणनू रवीने दुकानदाराला द्यावयाचा एकूण किंमत ₹ 12.

**उदाहरण 2 :**

₹ 75.80 आणि ₹ 125.90 यांची बेरीज करा.

| रुपये | पैसे |
|---|---|
| (1) | |
| 75 | 80 |
| 125 | 90 |
| 201 | 70 |

80 + 90 = 170 पैसे

80 पैसे
90 पैसे
170 पैसे

170

उत्तर ₹201.70

**तुम्हाला माहीत आहेच, त्याप्रमाणे रूपये व पैसे स्तंभाची बेरीज करा.**

**निरीक्षण : रक्कमेची बेरीज करताना**

1) रूपये नेहमी रूपये स्तंभात लिहा.

2) पैसे नेहमी पैसे स्तंभात लिहा.

3) पैशांची पैशांबरोबर बेरीज करून पैशांच्या स्तंभात लिहा.

4) रूपयांची रूपयांबरोबर बेरीज करून रूपये स्तंभात लिहा.

5) जेव्हा पैशांची पैशाबरोबर बेरीज केल्यानंतर जर एकूण 100 पैसे किंवा त्यापेक्षा मोठी संख्या येत असेल तर त्याचे रूपयामध्ये रूपांतर करून नंतर रूपयांची बेरीज करावी.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## नमुना उदाहरणे

### उदाहरण 1 :

| | रुपये | पैसे |
|---|---|---|
| | ① | |
| | 29 | 61 |
| (+) | 76 | 45 |
| | 106 | 06 |

- पैशांची पैशाबरोबर बेरीज करा.
- रूपयांची रूपयाबरोबर बेरीज करा.
- हातचा घेऊन सख्यांची बेरीज करा.

उत्तर ₹106.06

### उदाहरण 2 :

| | रूपये | पैसे |
|---|---|---|
| | ①① | ① |
| | 3 6 | 54 |
| | 7 3 | 42 |
| (+) | 5 1 | 27 |
| | 161 | 23 |

उत्तर ₹161.23

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

### उदाहरण 3 :

₹ 14.55, ₹ 22.17 आणि ₹ 8.34 ची बेरीज करा.

| रूपये | पैसे |
|---|---|
| 14 | 55 |
| 22 | 17 |
| 8 | 34 |
| 45 | 06 |

- अंक असे लिहा कि दशांश चिन्ह एका खाली एक येईल.
- हातचा घेऊन सख्यांची बेरीज करा.

उत्तर ₹ 45. 06

## लेखी उदाहरणे

### उदाहरणे 1 :

अमितने एक पुस्तक ₹ 18.50 आणि एक रंगीत पेन्सिल बॉक्स ₹ 19.50 ला विकत घेतला तर त्याने एकूण किती रक्कम द्यावी?

मागील इयत्तेत तुम्ही एकूण रक्कम कशी काढतात ते शिकला आहात. याचप्रकारची उदाहरणे सोडविण्यासाठी कोणत्या मुलभूत क्रिया वापरतात.

| | | |
|---|---|---|
| पुस्तकासाठी दिलेली रक्कम | = | ₹ 18.50 |
| रंगीत पेन्सिल बॉक्ससाठी दिलेली रक्कम | = | ₹ 19.50 |
| अमितने द्यावयाची एकूण रक्कम | = | ₹ 38.00 |

### उदाहरण 2 :

राधाकडे ₹ 15.00, सलमानकडे ₹ 25.00 आणि मेरीकडे ₹ 17.05 आहते. तर त्यांच्याजवळ एकूण किती रक्कम आहे?

| | | |
|---|---|---|
| राधाकडील रक्कम | = | ₹ 15.00 |
| सलमानकडील रक्कम | = | ₹ 25.00 |
| मेरीकडील रक्कम | = | ₹ 17.05 |
| त्यांच्याजवळ असलेली रक्कम | = | ₹ 57.05 |

**निरीक्षण करा**

**लेखी उदाहरणे सोडविताना–**

- दिलेल्या गोष्टी पायरी पायरीने लिहा.
- जेव्हा एकूण रक्कम काढा असे सांगतात तेव्हा बेरीज करावी.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय 10.1

**I. बेरीज करा**

1) ₹29.60
₹61.75
₹78.50
_______
_______

2) ₹50.50
₹19.00
₹44.50
_______
_______

**II. अ) ₹ 7 आणि ₹ 8.50 ची बेरीज करा**

_______________________________________________
_______________________________________________
_______________________________________________
_______________________________________________

**आ) ₹ 45.35 आणि ₹ 33.29 ची बेरीज करा**

_______________________________________________
_______________________________________________
_______________________________________________
_______________________________________________

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**III.**

1) अमूल्याजवळ ₹ 25.50 आहेत. तिच्या मावशीने तिला ₹ 50 दिले. तर अमूल्याजवळ आता एकूण किती रक्कम आली?

अमूल्याजवळ असलेली रक्कम = ₹

मावशीने दिलेली रक्कम = ₹
_______________________________________________
आता अमूल्याजवळ असलेली रक्कम = ₹
_______________________________________________

2) एका पुस्तक दुकानामध्ये असलेल्या पुस्तकांची किंमत खालील प्रमाणे आहे.










रवीने पुस्तक दुकानातून वरील तीन पुस्तके विकत घेतली. तर त्याने एकूण किती रक्कम दुकानदाराला दिली?

| पुस्तकाचे नांव | किंमत | |
|---|---|---|
| | रूपये | पैसे |
| कोड्याच्या पुस्तकाची किंमत | | |
| पंचतंत्र गोष्टी पुस्तकाची किंमत | | |
| कथेमधील करमणूक पुस्तकाची किंमत | | |
| एकूण किंमत | | |

रवीने एकूण द्यावयाची रक्कम : ₹

3) थॉमसने गणित पुस्तक ₹ 47. 50, विज्ञान पुस्तक ₹ 35.25 आणि एक वही ₹18 ला विकत घेतली तर एकूण किती रक्कम दुकानदाराला द्यावी लागेल?

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

4) सुरेखाने 3 चेंडू ₹ 30 ला, 5 पेन्सिली ₹ 12.50 ला आणि 4 वह्या ₹ 20 ला खरेदी केल्या. म्हणून तिने दुकानदाराला एकूण किती रक्कम द्यावी लागेल?

______________________________

______________________________

______________________________

**कृती :** वर्तमानपत्रातील जाहिरातीचे निरीक्षण करा. कोणत्याही 4 वस्तूंची किंमत लिहा. त्या वस्तू विकत घ्यावयाच्या असतील तर एकूण रक्कम काढा.

______________________________

______________________________

______________________________

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## रकमेची वजाबाकी

**गट न करता स्तंभात मांडणी करून रूपये व पैसे यांची वजाबाकी कशी करतात ते माहीत आहे.**

मागील इयत्तेत तुम्ही स्तंभात मांडणी करून रूपये आणि पैसे यांची वजाबाकी कशी करतात ते शिकला आहात.

ते आठवून खालील उदाहरणे सोडवा.

**उदाहरण 1 :** ₹ 79.80 मधून ₹ 69.90 वजा करा.

| रूपये | पैसे |
|---|---|
| 7 ~~9~~ (1) | 8 0 |
| (-) 6 9 | 9 0 |
| 0 9 | 9 0 |

उत्तर : ₹ 9.90

**पायऱ्या**

1) रूपये नेहमी रूपये स्तंभात लिहा.

2) पैसे नेहमी पैसे स्तंभात लिहा.

3) पैशामधनू पैसे वजा करा.

80 पैशामधून 90 पैसे वजा करता येतात का? विचार करा. हे शक्य नाही. रूपये स्तंभातून रू.1 घेऊन त्याचे पैशामध्ये रूपांतर करा.

80 पैशामध्ये 100 पैसे मिळवा.

100 +80 =180 पैसे

| |
|---|
| 180 पैसे |
| 90 पैसे |
| 9 0 पैसे |

180 पैशामधून 90 पैसे वजा करता येतात का?

पैसे स्तंभात उत्तर 90 लिहा.

आता 79 मधील एक पैसे स्तंभात घ्या. म्हणून रूपये स्तंभामधून किती रूपये कमी झाले? विचार करा.

₹ 79 – ₹ 1 = ₹ 78

₹ 78 मधून ₹ 69 वजा करा.

हातचा घेऊन वजाबाकी करा.

उत्तर ₹ 78 – ₹ 69 = ₹ 09

∴ ₹ 09 हे रूपये स्तंभात लिहा.

**उदाहरण 2 :** ₹ 125,47 मधून ₹ 114.48 वजा करा.

| रूपये | पैसे |
|---|---|
| 12~~5~~④ <br> – 114 | 47 <br> 48 |
| 010 | 99 |

उत्तर ₹10.99

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

उदाहरण 1 प्रमाणे वजाबाकी करा.

1) 147 पैसे
- 48 पैसे
99 पैसे

(हातचा घेऊन संख्यांची वजाबाकी करा)

2) ₹124 - ₹114
₹124
-₹114
₹010

**निरीक्षण करा :**

- गट न करता पैशाची वजाबाकी करताना हातचा घेऊन संख्यांची वजाबाकी करा.
- आमच्या दैनंदिन जीवनात पैशाचा व्यवहार करताना आम्ही ₹ 3.47, ₹ 5.42 इत्यादी सारखे अपूर्णांक वापरत नाही जेव्हा बँकेचा हप्ता, कर रक्कम इ.चे व्याज काढताना जर रक्कम पर्णांकामध्ये नसेल तर जवळच्या रूपयाजवळ ही रक्कम पूर्णांकामध्ये घेतली जाते.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**नमुना उदाहरणे :**

**1) ₹ 76.25 मधून ₹ 44.75 वजा करा**

₹76 .25
-₹44 .75
₹31. 50

- पैशामधून पैसा वजा करा.
- रूपयामधून रूपये वजा करा.
- हातचा घेऊन संख्यांची वजाबाकी करा.

**2) ₹85.15 मधून ₹25.18 वजा करा**

₹85 .15
-₹ 25 .18
₹ 59 .97

- पैशामधून पैसा वजा करा.
- हातचा घेऊन संख्यांची वजाबाकी करा.

## लेखी उदाहरणे :

1) सलमानला ₹ 97.50 मिळाले त्यातील ₹ 85.75 चे टी शर्ट त्याने खरेदी केले. तर त्याच्या जवळ शिल्लक राहीलेले रक्कम किती?

तुम्ही मागील इयत्तेत राहिलेली रक्कम कशी काढतात ते शिकला आहात. ते आठवून ही उदाहरणे सोडवा.

| | रूपये | पैसे |
|---|---|---|
| सलमान जवळील रक्कम | 9 7 | 5 0 |
| टी-शर्टला दिलेली रक्कम | 8 5 | 7 5 |
| शिल्लक रक्कम ₹ | 1 1 | 7 5 |

* रूपये हे रूपये स्तंभात लिहा.
* पैसे हे पैसे स्तंभात लिहा.
* हातचा घेऊन संख्यांची वजाबाकी करा.

उत्तर ₹11.75

2) पौर्णिमाला ₹158.50 मिळाले. तिने ₹49.75 च्या बांगड्या खरेदी केल्या. तर तिच्याजवळ शिल्लक राहिलेली रक्कम किती?

| | रूपये | पैसे |
|---|---|---|
| पौर्णिमाजवळील रक्कम | 4 (1)7<br>158 | (1)<br>50 |
| बांगड्यासाठी दिलेली रक्कम | 49 | 75 |
| शिल्लक रक्कम | 108 | 75 |

**निरीक्षण :** शिल्लक रक्कम काढण्यासाठी वजाबाकी ही क्रिया वापरतो.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

### स्वाध्याय 10.2

**I. वजाबाकी करा :**

1) ₹76.25
(-)₹44.50
________

2) ₹98.50
(-)₹55.50
________

**II. अ) ₹ 18.50 हे ₹ 25.10 मधून वजा करा.**

**आ) ₹ 30.50 हे ₹ 75.50 मधून वजा करा.**

**III. सोडवा**

1) **सोनिकाला ₹ 50 मिळाले. तिने ₹ 45.50 च्या बांगड्या आणि रिंग विकत घेतली तर तिच्या जवळ शिल्लक राहिलेली रक्कम किती?**

| | |
|---|---|
| सोनिकाजवळील रक्कम | ₹50.00 |
| बांगड्या व रिंगसाठी दिलेली रक्कम | ₹45.50 |
| सोनिका जवळील शिल्लक रक्कम | ₹ |

2) **डेव्हीड ₹399.99 चे बुट विकत घेऊ इच्छितो. त्याच्या कडे फक्त ₹25.50 आहेत. तर बुट विकत घेण्यासाठी त्याला अजून किती रक्कमेची गरज आहे?**

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

3) लक्ष्मणने ₹ 52.50 ची पोस्ट तिकिटे व पोस्टकार्ड विकत घेतली. त्याने पोस्टातील कर्मचाऱ्याला ₹ 100 ची नोट दिली. तर किती रक्कम लक्ष्मणला परत मिळाली पाहिजेत?

4) सौम्याकडे ₹ 37.50 आहते. तिने ₹ 23.50 ची भाजी विकत घेतली. तर तिच्याजवळ किती रक्कम शिल्लक राहिली?

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

## एक किंवा अनेक वस्तूंची किंमत शोधणे –

खालील आकृतीतील वस्तू आणि त्यांची किंमत याचें निरिक्षण करा.

| | | |
|---|---|---|
|  ₹ 5 |  ₹ 2 |  ₹ 3.50 |

शामनाथने 3 चॉकलटे खरेदी केले. त्याला किती रक्कम द्यावी लागेल ?

3 चॉकलेटची किंमत किती आहे? विचार करा.

1 चॉकलेटपेक्षा यांची किंमत जास्त होईल का? किंवा किंमत कमी होईल ? अंकगणितातील कोणती मुलभतू क्रिया यासाठी वापरावी लागेल?

1 चॉकलेटची किंमत आहे ₹ 2

तीन वेळा याची बेरीज करू शकता? ₹ 2 + 2 + 2 = 6

तुम्ही मागील प्रकरणात शिकला आहात की गुणाकार म्हणजचे पुनरावर्तीत सख्यांची बेरीज. म्हणून, थोडक्यात ₹ 2 × 3 होय की नाही?

मागील प्रकरणात तुम्ही गुणाकाराची मुलभूत क्रिया शिकला आहात.

गुणाकाराची मुलभूत क्रिया आठवून गुणाकार करा.

₹ 2 × 3 = ₹ 6

म्हणून, शामनाथने द्यावयाची रक्कम = ₹ 6

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**निरीक्षण :** जर आम्हाला एका वस्तूंची किंमत माहित असेल आणि त्याच प्रकारच्या अनेक वस्तूंची किंमत काढायची असेल तर गुणाकार ही मुलभूत क्रिया वापरावी.

2) रवीने 4 पेन्सिलस् खरेदी केल्या. त्याला एकूण किती रक्कम द्यावी लागेल? येथे अंकगणितातील कोणती मुलभूत क्रिया वापरावी?

गुणाकार

1 पेन्सिलची किंमत = ₹ 3.50

4 पेन्सिलची किंमत = ₹ 4 × 3.50

= ₹ 14.00

**निरीक्षण :** दशाशं अपूर्णांकातील रकमेचा गुणाकार करताना सख्येप्रमाणेच गुणाकार करावा आणि गुणाकाराच्या उजव्या बाजूकडून 2 अंक सोडून दशांश चिन्ह द्यावे.

## स्वाध्याय 10.3

1) नाचणाऱ्या बाहुलीची किंमत ₹ 45 आहे. अशा 3 बाहुल्यांची एकूण किंमत किती?

2) स्वयंपाक तेलाच्या एका पाकिटाची किंमत ₹ **82.50** आहे. तर अशा 5 पाकिटाची किंमत किती?

3) एक माणूस दररोजच्या जेवणासाठी ₹ **95.50** खर्च करतो. तर एका आठवड्यात जेवणासाठी त्याने किती खर्च केले?

4) एका पुस्तकाची किंमत ₹ **23.75** आहे. अशा 5 पुस्तकांची एकूण किंमत किती?

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## एका वस्तूची किंमत शोधून काढणे

सुरेशने दुकानातून ₹ 6 ला 3 चॉकलेट विकत घेतले. 3 चॉकलेटची किंमत तुम्हाला माहित आहे.

1 चॉकलेटची किंमत कशी काढतात? विचार करा.

अंकगणितातील कोणती मुलभूत क्रिया यासाठी वापरतात? विचार करा.

6 चे 3 समान भाग करा.

| ₹1 ₹1 | ₹1 ₹1 | ₹1 ₹1 |
|---|---|---|

प्रत्येक भागात आपणाला दोन मिळतात.

मागील वर्गात असताना तुम्हाला माहीत आहे की भागाकार म्हणजेच समान वाटणी.

म्हणून ₹ 6 ला 3 ने भागा

3) 6 (2
6
―
0

∴ $6 \div 3 =$ ₹ 2

> **निरीक्षण :** एका वस्तूची किंमत काढायची असेल तर अंकगणितातील भागाकार ही मुलभूत क्रिया वापरतात. संख्यांच्या भागाकार पद्धतीनेच आर्थिक व्यवहारात सुद्धा भागाकार केला जातो.

**नमनु ा उदाहरण :**

**1) जर 4 साबणाची किंमत ₹ 20 तर 1 साबणाची किंमत किती?**

**उत्तर :** 4 साबणाची किंमत = ₹ 20

1 साबणाची किंमत = $\dfrac{\text{सर्व साबणाची किंमत}}{\text{एकूण साबण}}$

$= \dfrac{20}{4}$

4) 20 (5
20
―
00

एका साबणाची किंमत = ₹ 5

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

2) जर 5 चेंडूची किंमत ₹ 50 आहे तर 1 चेंडूची किंमत किती?

उत्तर : 5 चेंडूची किंमत = ₹ 50

3 चेंडूची किंमत = 50 ÷ 5

1 चेंडूची किंमत = ₹10

5) 50(10
50
----
00
----

## स्वाध्याय 10.4

1) जर 6 बाहुल्यांची किंमत ₹ 42 आहे. तर 1 बाहुलीची किंमत किती?

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

2) जर 8 पेनची एकूण किंमत ₹ 72 आहे तर 1 पेन ची किंमत किती?

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

3) जर 4 पेनची एकूण किंमत ₹ 40 आहे. तर 1 पेनची किंमत किती?

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**4) जर 4 पेन्सिलची एकूण किंमत ₹ 16 आहे. तर 1 पेन्सिलची किंमत किती?**

___

___

___

___

## दरफलक आणि पावत्या (बिल)

मागील इयत्तेत तुम्ही दरफलक आणि पावत्या याविषयी शिकला आहात दरफलकावरून दुकानातून पाहिजे असलेल्या वस्तूंची किंमत आपणाला समजते तर दुकानातून खरेदी केलेल्या सर्व वस्तूंची संपूर्ण माहिती पावतीमुळे समजते. ते आठवून खालील रिकाम्या जागा भरा.

1) दुकानामधून खरेदी केलेल्या वस्तूंची संपूर्ण माहिती देणाऱ्या स्लिपला ________ म्हणतात.

2) प्रत्येक वस्तूची किंमत लिहिलेल्या दुकानातील बोर्डला ________ म्हणतात.

3) पावतीमध्ये एकूण किंमत ही अंकामध्ये आणि ________ मध्ये लिहितात.

**खालील उदाहरणाचे निरिक्षण करा.**

**उदाहरण 1 :** नवीन टेक्स्टाईलमधून सुमाने काही कपडे खरेदी केले. दुकानदाराने दिलेल्या पावतीची कॉपी खालीलप्रमाणे आहे. तिचे निरिक्षण करा.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**नवीन टेक्स्टाईल** TIN : 12344456789

बेंगळूरु- 57

क्रमांक : 5379 दिनांक : 15-08-2017

ग्राहकाचे नांव : सुमा

| अ.नं. | तपशील | नग | किंमत (₹) | | एकूण किंमत (₹) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | साडी | 1 | 470.00 | | 470 . 00 |
| 2 | शर्ट | 2 | 150.00 | | 300.00 |
| 3 | पॅन्ट | 2 | 189.00 | | 378.00 |
| | | | | व्हॅट | 1148.00<br>63.00 |
| | | | | एकूण किंमत | 1211.00 |

अक्षरी : ₹ एक हजार दोनेशेहे अकरा.

सही

**नियम व अटी :**

- किंमत परत दिली जाणार नाही.
- खरेदी केलेली वस्तू 3 दिवसात बदलून घेता येईल.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पावतीमध्ये दिलेल्या सर्व गोष्टीची यादी करा.

1) दुकानाचे नाव आणि पत्ता
2) पावती नंबर
3)
4)
5)
6)
7)

**लक्षात ठेवा :**

- पावती ही वस्तू खरेदीचा पुरावा असतो.
- ग्रहकाने खरेदी केलेली वस्तू बदलून घेणे व नियमाप्रमाणे एकूण किंमत दुकानदाराला दिली. हा पावतीचा उपयागे असतो.
- वस्तूची पावती विचारणे आणि घेणे हा ग्राहकाचा हक्क आहे.
- काही दुकानामध्ये कॉम्प्युटरमधून पावती काढून ती ग्राहकाला दिली जाते.

**उदाहरण 2 :** भाजीच्या दुकानातून काही भाज्या खरेदी केल्या. त्याची पावती खालील प्रमाणे आहे.

कोमल व्हेजिटेबल शॉप TIN : 12368943211

कमलानगर

नंबर : 613 तारीख : 01-10-2017

ग्राहकाचे नांव : रमेश

रोख पावती

| अ.नं. | तपशील | नग | किंमत (₹) | एकूण रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| 1 | बिनीस | 1 कि.ग्रॅ. | 40 . 00 | 40 . 00 |
| 2 | भेंडी | 2 कि.ग्रॅ. | 30 . 00 | 60 . 00 |
| 3 | बीट | 2 कि.ग्रॅ. | 20 . 00 | 40 . 00 |
| 4 | नवलकोल | 1 कि.ग्रॅ. | 25 . 00 | 25 . 00 |
| | | | एकूण रक्कम | 165 . 00 |

**अक्षरी :** ₹ एकशे पासष्ट फक्त

सही

**नियम व अटी**

- किंमत परत दिली जाणार नाही.
- एकदा विकलेली वस्तू परत घेतली जाणार नाही.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

वरील पावतीच्या तपशीलाचे निरिक्षण करा. विकत घेतलेल्या सर्व वस्तूंची एकूण किंमत कशी काढतात?

रेमशने विकत घेतलेल्या बिनीसचे प्रमाण किती?

1 कि.ग्रॅ. बिनीसची किंमत किती?

किती किंमतीचे बिनीस त्याने विकत घेतले?

नग $\times$ किंमत = एकूण किंमत

1 $\times$ 40 = ₹ 40

निरिक्षणाने प्रत्येक भाजीची किंमत काढा.

खरेदी केलेला सर्व वस्तूंची एकूण किंमत कशी काढतात? विचार करा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**निरिक्षण :**

- प्रत्येक वस्तुच्या किंमतीचा त्यांच्या एकूण नगाने गुणाकार केल्यास एकूण किंमत मिळते.
- सर्व वस्तूंच्या किंमतीची बेरीज करून एकूण किंमत मिळविता येते.

**उदाहरण 3 :**

विकत घेतलेल्या सर्व वस्तूंची एकूण किंमत कशी काढतात हे तुम्ही शिकला आहात आता पुढील पावती पूर्ण करा.

**जे. के.बेकरी** TIN : 98456284350

बोमसांद्रा

क्रमांक : 501 तारीख : 05-12-2017

ग्राहकाचे नाव : पीटर

रोख पावती

| अ.नं. | तपशील | नग | दर (₹) | एकूण किंमत (₹) |
|---|---|---|---|---|
| 1 | केक | 2 | 10 | - |
| 2 | चॉकलेट | 10 | 5 | 50.00 |
| 3 | बनस् | 5 | - | 25 . 00 |
| 4 | आईसक्रीम | 10 | 5 | 50 . 00 |
| | | | एकूण किंमत | |

अक्षरी :

सही

**नियम व अटी :**

- वस्तूंची किंमत परत दिली जाणार नाही.
- एकदा विकलेली वस्तू परत घेतली जाणार नाही किंवा बदलून दिली जाणार नाही.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

रोख पावती बद्दल तुम्ही समजनू घेतला.

- उधारी पावती, अंदाज किंमतीची पावती इ. बद्दल तुम्ही ऐकला असाल त्याचा अर्थ व वापर याबद्दल तुमचे शिक्षक किंवा वडीलधाऱ्याकडून जाणून घ्या.
- आम्ही खरेदी केलेल्या वस्तू कराखाली येतात का? तुमच्या शिक्षकांबरोबर चर्चा करा.

## स्वाध्याय 10.5

**1. खालील पावती किंवा बिल पूर्ण करा.**

**रहमत प्रोव्हिजन शॉप** TIN : 22448567539

बसवन्नहळ्ळी

नं. : 63 तारीख : 10-12-2017

ग्राहकाचे नांव : उमेश रोख पावती

| अ.नं. | तपशील | नग | किंमत | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|
| 1 | तुरडाळ | 1 कि.ग्रॅ. | 80 . 00 | |
| 2 | साखर | 2 कि.ग्रॅ. | 36 . 00 | 72 . 00 |
| 3 | चावल | 2 कि.ग्रॅ. | 54 . 00 | 108 . 00 |
| | | | एकूण | |

**अक्षरी :** सही

**नियम व अटी**

- किंमत परत दिली जाणार नाही.
- एकदा विकलेली वस्तू परत घेतली जाणार नाही.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**2. खाली दिलेल्या यादीचे निरिक्षण करा.**

| अहमदचे स्वस्त धान्याचे दुकान<br>संतेबिदी, कोडीहळ्ळी<br><br>तारीख : 27-01-2014 | | | |
|---|---|---|---|
| अ.नं. | तपशील | नग | किंमत (₹) |
| 1 | तुरडाळ | 1 कि.ग्रॅ. | 70. 00 |
| 2 | साखर | 1 कि.ग्रॅ. | 32.00 |
| 3 | हरभरा डाळ | 1 कि.ग्रॅ. | 60.00 |
| 4 | मुगडाळ | 1 कि.ग्रॅ. | 95.00 |
| 5 | उडद | 1 कि.ग्रॅ. | 70.00 |
| 6 | रवा | 1 कि.ग्रॅ. | 28.00 |
| 7 | गूळ | 1 कि.ग्रॅ. | 50.00 |
| 8 | कोथमीर | 1 कि.ग्रॅ. | 120.00 |

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

अहमदच्या दुकानामधून दि. 27.01.2014 रोजी गौरम्माने खालील वस्तू खरेदी केल्या त्याचा तपशील पुढे दिला आहे.

1) हरभरा डाळ 1 कि.ग्रॅ.
2) तुरडाळ 2 कि.ग्रॅ.
3) रवा 2 कि.ग्रॅ.
4) साखर 1 कि.ग्रॅ.

## दुकानातील सामानाच्या किंमतीच्या यादीचे निरिक्षण करून त्यानुसार यादी तयार करा.

**कृती :** वेगवेगळ्या दुकानामधून काही पावत्या गोळा करा व त्यामधील गोष्टींचा पडताळा करून त्या समजावून घ्या.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

प्रकरण– 11

# लांबीचे मापन

Q1Z1J2

**या प्रकरणाच्या अध्ययनानंतर तुम्ही :**

- लांबीचे एकक समजावून घ्याल.
- मीटर आणि सेंटीमीटर यामधील संबंध समजेल.
- मीटरचे सेंटीमीटरमध्ये व सेंटीमीटरचे मीटरमध्ये रूपांतर कराल.
- लांबीच्या मापनाची बेरीज कराल.
- लांबीमधील फरक काढण्याच्या पद्धती समजावनू घ्याल.
- वस्तूची लांबी आणि दाने स्थळातील अंतर यांचा अंदाज कराल.

NOT TO BE REPUBLISHED
© KTBS

## लांबी



दुकानामध्ये जेव्हा तुम्ही कापड खरेदी करता, तेव्हा पाहिजे असलेल्या कापडाची लांबी मोजण्यासाठी दुकानदार कोणत्या उपकरणाचा उपयोग करतो? जेव्हा तुम्ही दुकानातून टेप (मोजपट्टी) विकत घेता त्याचप्रकारचे उपकरण (साधन) दुकानदार वापरतो. त्या उपकरणाचे (साधन) नाव काय?

तो 'मोजण्याचा टेप' हे उपकरण (साधन) वापरतो. मोजण्याचा टेप मिळवून त्यावरील खुणांचे निरिक्षण करा.

मोजण्याचा टेपला 'मोजपट्टी' असेही म्हणतात. त्याचा नमुना खालीलप्रमाणे आहे–




मोजपट्टीमध्ये 0 पासून 100 पर्यंत किती समान भाग आहेत?

ते समान भाग आहेत 100. मोजपट्टीवरील प्रत्येक समान भागाला 1 सेंटीमीटर म्हणतात. मोजण्याच्या टेपमधील 100 सेंटीमीटर भागाला मीटरपट्टी म्हणतात.

1 मीटर = 100 सेंटीमीटर

**टीप :** सेंटीमीटर हे सें.मी. आणि मीटर हे मी. असे दर्शवितात.

**कृती :** टेलरच्या दुकानाला भेट द्या. तो वापरत असलेल्या टेप विषयी विचारून त्याच्या दोन्ही बाजूला केलेल्या खुणांचे निरीक्षण करा. त्या टेपची तुलना मीटरपट्टी बरोबर करा. जर तुम्हाला कोणताही फरक मिळाला तर तुमच्या शिक्षकांबरोबर चर्चा करा.



याचप्रमाणे, कोणत्या प्रसंगी मीटरपट्टी आणि मोजण्याचा टेप वापरतात? यांची यादी करा.

1) ..............................................................

2) ..............................................................

3) ..............................................................

4) ..............................................................

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## मीटरचे सेंटीमीटर मध्ये रुपातंर करणे

**कृती :**

तुम्हाला माहीत आहे 1 मीटर = 100 सेंटीमीटर प्रत्येकी 100 सें.मी. लांबीचे दोन दोरे घेऊन ते एकमेकांना जोडा आणि त्यांची एकूण लांबी मीटरपट्टीने मोजा. तुमचे उत्तर काय आहे? याचप्रमाणे प्रत्येकी 100 सें. मी. लांबीचे तीन दोरे घेऊन ते जोडून त्यांची एकूण लांबी मोजा. तुमचे उत्तर काय आहे? यावरून तुम्ही काय शिकला?

200 सें.मी. म्हणजेच 2 मी. आणि 300 सें.मी. म्हणजेच 3 मी. होय

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**खालील उदाहरणे लक्षात घ्या.**

1 मी. = 100 सें.मी.

2 मी. = 2 × 100 सें.मी. = 200 सें.मी.

3 मी. = 3 × 100 सें.मी. = 300 सें.मी.

त्याचप्रमाणे, 4 मी. = 4 × 100 सें.मी. = 400 सें.मी.

**टीप:**

मीटरचे सेंटीमीटरमध्ये रूपांतर करताना 100 ने गुणावे.

नमुना उदाहरण

1) 5 मीटरचे सें.मी. मध्ये रूपांतर करा.

1 मी.= 100 सें.मी.

5 मी. = 5 × 100 सें.मी.

= 500 सें.मी.

## स्वाध्याय 11.1

**I. खालील मोजमापचे सेंटीमीटरमध्ये रूपांतर करा.**

1) 9 मीटर

______________________

______________________

______________________

2) 12 मीटर

______________________

______________________

______________________

3) 14 मीटर

______________________

______________________

______________________

4) 10 मीटर

______________________

______________________

______________________

5) 20 मीटर

______________________

______________________

______________________

6) 33 मीटर

______________________

______________________

______________________

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**II. योग्य उत्तराने रिकाम्या जागा भरा.**

1) 6 मी. = ........................ सें.मी.

2) 11 मी. = ........................ सें.मी.

3) 39 मी. = ........................ सें.मी.

4) 12 मी. 16 सें.मी. = ........................ सें.मी.

5) 4 मी. 70 सें.मी. = ........................ सें.मी.

**III. 'A' मध्ये मोजमाप मीटरमध्ये आणि 'B' मध्ये मोजमाप सेंटीमीटरमध्ये दिलेले असून 'A' च्या 'B' बरोबर जोड्या जुळवा.**

| A | B | उत्तर |
|---|---|---|
| 1) 4 मी. | a) 705 सें.मी. | ________ |
| 2) 7 मी. | b) 450 सें.मी. | ________ |
| 3) 7 मी. 20 सें.मी. | c) 700 सें.मी. | ________ |
| 4) 4 मी. 50 सें.मी. | d) 720 सें.मी. | ________ |
| | e) 400 सें.मी. | ________ |

## सेंटीमीटरचे मीटरमध्ये रूपांतर करणे

तुम्हाला अगोदरच माहित आहे की 100 सें.मी. = 1 मीटर, 200 सें.मी. लांबीमध्ये 100 सें.मी. मोजमापाचे किती समान भाग आहेत? त्याचप्रमाणे 300 सें.मी. लांबीमध्ये 100 सें.मी. मोजमापाचे किती समान भाग आहेत?

200 सें.मी. = 100 सें.मी. + 100 सें.मी.
= 1 मी. + 1 मी.
= 2 मी.

त्याचप्रमाणे 300 सें. मी. = 100 सें.मी. + 100 सें.मी. + 100 सें.मी.
= 1 मी. + 1 मी. + 1 मी.
= 3 मी.

हे सामान्य स्वरूपात असेही लिहितात.

**200** सें.मी. = $\frac{200}{100}$ = **2** मी.

**300** सें.मी. = $\frac{300}{100}$ = **3** मी.

**निरिक्षण:** मीटरचे सेंटीमीटरमध्ये रूपांतर करताना 100 ने भागावे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**नमुना उदाहरण :**

500 सें.मी. चे मीटरमध्ये रूपांतर करा.

500 सें.मी. = $\frac{500}{100}$ = 5 मी.

100 सें.मी. = 1 मी.

## स्वाध्याय 11.2

**I. खालील मोजमापांचे मीटरमध्ये रूपांतर करा.**

1) 800 सें.मी.

2) 900 सें.मी.

3) 600 सें.मी.

4) 1000 सें.मी.

5) 3000 सें.मी.

6) 300 सें.मी.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**II. योग्य उत्तराने रिकाम्या जागा भरा.**

1) 400 सें.मी. = .................... मी.

2) 900 सें.मी. = .................... मी.

3) 875 सें.मी. = .................... मी. .................... सें.मी.

4) 750 सें.मी. = .................... मी. .................... सें.मी.

**III. चुक कि बरोबर ते सांगा.**

1) 20 मी. = 1000 सें.मी. ☐

2) 5 मी. = 500 सें.मी. ☐

3) 150 सें.मी. = $1\frac{1}{2}$ मी. ☐

4) 750 सें.मी. = 75 मी. ☐

## लांबीची बेरीज

मागील इयत्तेत तुम्ही संख्यांची बेरीज शिकला आहात. संख्यांची बेरीज ही त्यांच्या स्थानमुल्यानुसार करतात. याचप्रमाणे, लांबीची बेरीज सुद्धा करतात.

**कृती :**



राधाने खेळण्याचा टेलिफोन तयार करण्यासाठी 5 मीटर दोरा वापरला. रिटाने खेळण्याचा टेलिफोन तयार करण्यासाठी 12 मीटर दोरा वापरला. तर एकूण किती लांबीचा दोरा दोघानी वापरला? राधा आणि रिटाने वापरलेल्या दोऱ्याचे मोजमाप मीटरमध्ये आहे. म्हणून संख्याच्या बेरजेनुसार दोन्ही मोजमापांची बेरीज करा.

| | |
|---|---|
| राधाने वापरलेल्या दोऱ्याची लांबी | = 5 मी. |
| रिटाने वापरलेल्या दोऱ्याची लांबी | = 12 मी. |
| एकूण लांबी | = 17 मी. |

**कृती:**



शाळेत स्वातंत्र्यदिन साजरा करण्यासाठी रहिमने15 मी. 40 सें.मी. लांबीची पांढरी चिकटपट्टी व 12 मी. 35 सें.मी. लांबीची हिरवी चिकटपट्टी वापरली. तर त्याने एकूण किती लांबीची चिकटपट्टी वापरली?

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**निरिक्षण ::**

दोन्ही रंगाच्या चिकटपट्टीची लांबी मीटर आणि सेंटीमीटरमध्ये दिली आहे. म्हणून एकूण लांबी काढताना मीटरची मीटर बरोबर व सेंटीमीटरची सेंटीमीटर बरोबर बेरीज करा.

**त्याचप्रमाण**

| | | |
|---|---|---|
| पाढंऱ्या चिकटपट्टीची लांबी | = | 15 मी. 40 सें.मी. |
| हिरव्या चिकटपट्टीची लांबी | = | 12 मी. 35 सें.मी. |
| एकूण चिकटपट्टीची लांबी | = | 27 मी. 75 सें.मी. |

रहिमने वापरलेल्या चिकटपट्टीची एकूण लांबी 27 मी. 75 सें.मी.

## स्वाध्याय 11.3

**I. खालील मोजमापांची बेरीज करा.**

1) 150 मी.
 75 मी.
 ______

2) 137 मी.
 112 मी.
 ______

3) 250 मी.
 114 मी.
 ______

4) 450 मी.
 9 मी.
 ______

5) 25 मी.
 163 मी.
 ______

6) 80 मी.
 146 मी.
 ______

7) 22 मी. 10 सें.मी.
 14 मी. 6 सें.मी.
 ______

8) 20 मी. 12 सें.मी.
 13 मी. 60 सें.मी.
 ______

9) 73 मी. 47 सें.मी.
 35 मी. 18 सें.मी.
 ______

10) 25 मी. 46 सें.मी.
 5 मी. 28 सें.मी.
 ______

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**II. खालील उदाहरणे सोडवा.**

1) प्रितीकडे 18 मी. लाल रंगाची चिकटपट्टी व 15 मी. निळ्या रंगाची चिकटपट्टी आहे. तर तिच्याकडे एकूण किती लांबीची चिकटपट्टी आहे?

2) आझाद शाळेकडे पोहचण्यासाठी 800 मी. अंतर रिक्षाने व 50 मी. अंतर चालत जातो. तर तो एकूण किती अंतर जातो?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

3) मेरीकडे 10 मी. लांबीचा पांढरा दोरा आणि 18 मी 40 सें. मी. लांबीचा काळा दोरा आहे. तर तिच्याकडे एकूण किती लांबीचा दोरा आहे?

4) दुकानदाराने सकाळी 50 मी. 20 सें.मी. वायर विकली. दुपारी 60 मी. 40 सें.मी. वायर, तर संध्याकाळी 5 मी. 30 सें.मी. वायर विकली. तर त्याने एकूण किती लांबीची वायर विकली?

5) आकृतीचे निरिक्षण करून रिकाम्या जागा भरा.




1 ल्या व 2 ऱ्या झाडामधील अंतर आहे ...................

1 ल्या व 3 ऱ्या झाडामधील अंतर आहे ...................

1 ल्या व 4 थ्या झाडामधील अंतर आहे ...................

## लांबीची वजाबाकी

**कृती:** 80 से. मी. लांबीचा दोरा घ्या. त्यातील 30 सें मी. लांबीचा दोरा तोडा. राहिलेल्या दोऱ्याची लांबी मोजण्याच्या टेपने मोजा. तम्हाला काय उत्तर मिळाले. न मोजता राहिलेल्या दोऱ्याची लांबी कशी काढाल? विचार करा.

वरील उदाहरणात कोणती मुलभूत क्रिया वापरली पाहिजे?



© KTBS
NOT TO BE REPUBLISHED

## वरील आकृतीचे निरिक्षण करा.

रजनी 45 सें.मी. लांबीच्या दोऱ्यामध्ये मणी भरत आहे. तिने 32 सें. मी. लांबीच्या दोऱ्यामध्ये मणी अगोदरच भरले असून किती मापाच्या दोऱ्यामध्ये अजनू मणी भरले नाहीत? शोधा.

मणी भरलेला आणि मणी न भरलेल्या दोऱ्याची लांबी सें.मी. मध्ये आहे. संख्याच्या वजाबाकीप्रमाणे लांबीचे मोजमाप वजा करा.

| | | |
|---|---|---|
| दोऱ्याची लांबी | = | 45 सें.मी. |
| मनी भरलेल्या दोऱ्याची लांबी | = | 32 सें.मी. |
| मणी न भरलेल्या दोऱ्याची लांबी | = | 13 सें.मी. |

©KTBS NOT TO BE REPUBLISHED



बाजूच्या आकृतीत गौरी जानपद शैलीने भिंतीवर चित्रे काढणार असून त्या भिंतीची लांबी 5 मी. 50 सें. मी. आहे. पहिल्या दिवशी तिने 2 मी. 20 सें.मी. लांबीचे चित्र काढले. तर चित्रे काढायच्या राहिलेल्या भिंतीची लांबी कशी काढाल? विचार करा.

येथे मीटर आणि सेंटीमीटर मध्ये मोजमाप आहे. मीटरची मीटरमधून व सेंटीमीटरची सेंटीमीटरमधून वजाबाकी करून आपण राहिलेल्या भिंतीची लांबी काढता येते.

| | | |
|---|---|---|
| भिंतीची लांबी | = | 5 मी. 50 सें.मी. |
| चित्रे काढलेल्या भिंतीची लांबी | = | 2 मी. 20 सें.मी. |
| चित्रे काढायच्या राहिलेल्या भिंतीची लांबी | = | 3 मी. 30 सें.मी. |

## स्वाध्याय 11.4

**I. खालील उदाहरणात वरील मोजमापातून खालील मोजमाप वजा करा.**

1) 86 सें.मी. - 29 सें.मी.

2) 94 सें.मी. - 88 सें.मी.

3) 560 सें.मी. - 410 सें.मी.

4) 269 सें.मी. - 100 सें.मी.

5) 9 मी. 90 सें.मी. -5 मी. 60 सें.मी.

6) 86 मी. 70 सें.मी. -68 मी. 65 सें.मी.

7) 97 मी. 44 सें.मी. -54 मी. 32 सें.मी.

8) 171 मी. 82 सें.मी. -145 मी. 70 सें.मी.

9) 224 मी. 83 सें.मी. -165 मी. 75 सें.मी.

10) 267 मी. 87 सें.मी. -167 मी. 85 सें.मी.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**II. खालील उदाहरणे सोडवा.**

1) एक दोऱ्याच्या बंडलमध्ये 450 मी. दोरा आहे. जर त्या बंडलमधील 170 मी. दोरा दुकानदाराने विकला तर बडंलमध्ये शिल्लक राहिलेल्या दोऱ्याची लांबी किती?

2) अहमदने लहान बागेला कुंपण घालण्यासाठी 227 मी. 70 सें. मी लांबीची वायर आणली. कुंपणासाठी त्याने 190 मी. 40 सें.मी. लांबीची वायर वापरली तर त्याच्याकडे राहिलेल्या वायरची लांबी किती असेल?

3) एका कपड्याच्या बंडलमध्ये 125 मी. 80 सें. मी. कापड आहे. जर 70 मी. 30 सें.मी. कापड कापून बाजुला घेतले तर बंडलमध्ये राहिलेल्या कापडाची लांबी किती?

4) एक गिर्यारोहक पहिल्या दिवशी 475 मी. 60 सें.मी. अंतर चढतो आणि दुसऱ्या दिवशी 300 मी. 40 सें.मी. तर पहिल्या दिवसापेक्षा दुसऱ्या दिवशी तो गिर्यारोहक किती अंतर कमी चढतो?

5) मालवाहू आगगाडीची लांबी 242 मी. 60 सें.मी. असून प्रवासी आगगाडीची लांबी 109 मी. 25 सें. मी. आहे. कोणत्या आगगाडीची लांबी जास्त आहे? ती दुसरीपेक्षा किती लांबीने जास्त आहे?

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**समजून घ्या**

$\frac{1}{4}$ मीटर (मी) = 25 सेंटीमीटर (सें.मी.)

$\frac{1}{2}$ मीटर (मी) = 50 सेंटीमीटर (सें.मी.)

$\frac{3}{4}$ मीटर (मी) = 75 सेंटीमीटर (सें.मी.)

1 मीटर (मी) = 100 सेंटीमीटर (सें.मी.)

## योग्य मुलभूत एकक वापरून

**कृती:**

तुमच्या कंपासपेटीतील पट्टीचा उपयोग करून तुमच्या वर्गखोलीची लांबी मोजून ती लिहा.

नंतर मोजण्याच्या मीटरपट्टीने तीच लांबी मोजून ती लिहा.

कोणत्या पद्धतीने मोजलेली लांबी सोपी वाटते? विचार करा.

खाडे रबरची लांबी, पेन्सिलची लांबी, पिनची लांबी हे मीटरमध्ये मोजणे कठीण आहे होय की नाही? म्हणून कोणते मुलभूत एकक त्यासाठी योग्य आहे? विचार करा.

वरील सर्व वस्तूंची लांबी मोजण्यासाठी सोपे एकक आहे सेंटीमीटर. याचप्रमाणे फळ्याची एका बाजूची लांबी, खोलीची लांबी, रूंदी, उंची, मैदानाची लांबी व रूंदी हे मोजण्यासाठी मीटर हे एकक सोपे आहे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**कृती :** तुमच्या शाळेतील क्रिडांगणांची लांबी व रूंदी काढण्यासाठी मीटर हे एकक सोडून त्याचे दुसऱ्या एखाद्या मुलभूत एककामध्ये रूपांतर करता येते का? तुमच्या शिक्षकांबरोबर चर्चा करा व शिका.

मुलभूत एकक ‘किलोमीटर’ हे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणापर्यंतचे अंतर काढण्यासाठी वापरतात. त्याला किलोमीटर किंवा कि.मी. असे म्हणतात.

1 किलोमीटर (km) = 1000 मीटर (m)

## हे काय दर्शवित? विचार करा.




वरील आकृतीचे निरीक्षण करा. ती काय दर्शविते? विचार करा.

श्रीनिवासपूर आणि बेंगलूरू यामधील अंतर........................

श्रीनिवासपूर आणि मुळबागिलू यामधील अंतर..................

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**कृती:** रस्त्याच्या कडेला असलेल्या किलोमीटर दगडांचे निरीक्षण करा. ते अंतर दर्शवितात. त्यापासून तुम्ही काय शिकता? विचार करा. तुमच्या बाजूच्या स्थळाच्या अंतराची यादी करून कोणते स्थळ तुमच्या स्थळापासून जवळ व कोणते स्थळ दूर आहे ते शिका.

**समजून घ्या :**

1 किलोमीटर (कि.मी.) = 1000 मीटर (मी.)

$\frac{1}{4}$ किलोमीटर (कि.मी.) = 250 मीटर (मी.)

$\frac{1}{2}$ किलोमीटर (कि.मी.) = 500 मीटर (मी.)

$\frac{3}{4}$ किलोमीटर (कि.मी.) = 750 मीटर (मी.)

## लांबीच्या मापनाचा अंदाज करणे

अनेक प्रसंगी आपल्या दैनंदिन जीवनात लांबीचे मोजमाप एकदम बरोबर सांगू शकत नाही. ते अंतर जास्त किंवा कमी सांगतो.

तुमच्या घरापासून शाळेपर्यंतचे अंतर किती आहे? बस स्टँडपासून हॉस्पिटल पर्यंतचे अंतर किती आहे?

ते अंतर मोजल्याशिवाय आपण त्या प्रश्नांचे उत्तर देणे शक्य आहे का? प्रयत्न करा.

येथे बरोबर अंतर सांगणे शक्य नाही. म्हणून त्याचां अंदाज आपण करू शकता.

अंदाजे मोजमाप असणाऱ्या काही प्रसंगांची यादी करा.

1) ......................................

2) ......................................

3) ......................................

4) ......................................

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

वरील प्रसंगांचे निरिक्षण करा. त्याची लांबी व रूंदी न मोजता मोजण्याच्या तक्त्यात घेऊ शकतो. विचार करा.

### स्वाध्याय 11.5

**I. तुमच्या घरापासून अथवा जागेपासून अंदाजे अंतर सांगून रिकाम्या जागा भरा.**

i) पोस्ट ऑफीसपर्यंतचे अंतर ......................

ii) सरकारी दवाखान्याचे अंतर ....................

iii) बेंगलोरपर्यंतचे अंतर ....................

**IV. खाली दिलेल्या तक्त्यातील जागा / वस्तू पासून अंतराचे अंदाजे मोजमाप लिहा.**

| अ.नं. | वस्तू / स्थान | सेंटीमीटर (मीटर) | (मीटर) (मी.) | किलोमीटर (कि.मी.) |
|---|---|---|---|---|
| 1) | पेन्सिलची लांबी. | | | |
| 2) | तुमच्या वर्गखोलीच्या भिंतीची उंची. | | | |
| 3) | तुमच्या गणित पुस्तकाच्या एका बाजूची लांबी. | | | |
| 4) | तुमचे गांव / शहर पासून पुढील गांव / शहर या मधील अंतर. | | | |
| 5) | तुमचा वर्ग आणि स्वयंपाकघर यामधील अंतर. | | | |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रकरण–12

# मोजमाप (वजन)

J4G9C2

**या प्रकरणाच्या अध्ययनानंतर तुम्ही :**

- वजन करण्याची वेगवेगळी मापने ओळखाल.
- तराजूच्या उपयोगाच्या पद्धती समजावून घ्याल.
- वजन मोजण्याची वेगवेगळी एकके समजतील.
- किलो ग्रॅममध्ये असलेल्या वजनाचे ग्रॅममध्ये रूपांतर कराल.
- वजन मोजमापांची बेरीज व वजाबाकी कराल.
- अचकू मोजमाप काढण्याची पद्धत व अंदाजे मोजमाप काढण्याची पद्धत शिकाल.

## वजन

खालील आकृतीचे निरिक्षण करा.







यामध्ये काय निरीक्षण केला?

वेगवेगळ्या प्रसंगी वजन करणे व वजन करण्याच्या वेगवेगळ्या पद्धती यांचे निरिक्षण केले असेल–

दैनंदिन प्रसंगांची यादी करा की जेथे वजन केले जाते.

1) ..................................................................

2) ....................................................................

3) ....................................................................

4) ....................................................................

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

वस्तूंचे वजन करण्यासाठी काय वापरतात? वजना साठी कोणते एकक आहे? विचार करा.

भाज्यांचे वजन करण्यासाठी उपकरण वापरतात त्याचे तुम्ही निरीक्षण केला आहात काय?



तो तराजू आहे.

तराजूच्या दोन्ही पारड्यांचे निरीक्षण करा.

तराजूच्या डाव्या व उजव्या बाजूला काय ठेवतात? वजनाचे दगड डाव्या बाजूला व वजन करायची वस्तू उजव्या बाजूला तराजूमध्ये ठेवतात.

खाली दिलेल्या आकृतीमधील वजनाच्या दगडांचे निरीक्षण करा. त्यावर काय लिहिले आहे?




येथे किती प्रकारचे वजनाचे दगड आहेत? निरीक्षण करा. यांच्यात काही फरक आहे का?

काही वजनांच्या दगडावर कि.ग्रॅम आणि काही वर ग्रॅम असे लिहिले आहे.

यावरून तुम्हाला काय समजले? तुमचे अनमुान काय?

वजन हे किलोग्रॅम व ग्रॅममध्ये रूपांतरीत करता येते.

संक्षिप्तमध्ये किलोग्रॅमला कि.ग्रॅ. (kg.) आणि ग्रॅमला ग्रॅ (g) म्हणतात.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**कृती:** तुमच्या शाळेतील मध्यान्ह आहारात एका दिवशी वापरण्यात येणाऱ्या तांदूळ व डाळीचे प्रमाण याची माहिती तुमच्या शिक्षकांकडून जमा करा व ती लिहा. ती कि.ग्रॅ. व ग्रॅम मध्ये आहे ते तपासा

वस्तूचे मोजमाप हे कि.ग्रॅ व ग्रॅम मध्ये रूपांतरीत केलेले आहे हे कोणत्या प्रसंगी तुम्ही पाहिले? त्यापैकी दोन प्रसंगांची यादी करा.

1) वस्तूचे रूपांतर ग्रॅममध्ये : ____ ____ _____

2) वस्तूचे रूपांतर किलो ग्रॅममध्यें : ____ ____ _____

**कृती:** वजनाचे दगड न वापरता वजन करण्याची पद्धत पाहिली आहे का? तेथे कोणत्या प्रकारचे साधे यंत्र (मशीन) वापरतात? त्याचे नांव काय? तुमच्या शिक्षकांबरोबर चर्चा करा.

या प्रकारची वजन करण्याची पद्धत कोणत्या प्रसंगी वापरतात. त्यांची यादी करा.

जर एखादी वस्तू कमी प्रमाणात असेल तर ती ग्रॅममध्ये आणि जर ती मोठ्या प्रमाणात असेल तर ती किलोग्रॅम मध्ये सांगतात.

**निरिक्षण:** हल्ली लोक दुकानात वजन करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक मशीनचा उपयोग करतात. त्यावर वजन किलोग्रॅम व ग्रॅममध्ये आपल्याला दाखविते.

**1 किलोग्रॅम किती ग्रॅममुळे बनतो?**



या अगोदर तुम्ही वजनाचे दगड वापरून वजन करण्याचे शिकला आहात.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

